-न्याय-चातुर्य-कथा-

[-४-]

# अजिंक्य पंडीत

-आणि इतर कथा-

८

७ आणे



## 'अमर ज्योति वाङ्मय'

**(१) ५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें,** प्रस्तुत ('ज्योति-सामंत-स्मारक') संस्थेचा, दरवर्षीं दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

(२) प्रत्यक्ष कार्याला अवधि फार थोडा; कागद-छपाई-महर्गतां-नियंत्रणें इत्यादींची प्रतिकूल परिस्थिती; पण असल्या अनेक अडचणींतून वाट काढून, वर उल्लेखिलेल्या पत्रकांत **कल्पिलेल्या एकूण अठरा पुष्पांपैकीं शेवटीं फक्त बारा पुष्पेंच** कां होईनात, तेवढी तरी बालक-जगाला सादर करणें आम्हाला शक्य होत आहे. या बारा पुष्पांपैकीं (तीन पुष्पें थोडी अपूर्ण मुद्रित असल्यामुळें) **आज धनत्रयोदशीला आम्ही फक्त नऊ पुष्पेंच प्रकट करीत आहों. तीं उरलेलीं तीन, ५ डिसेंबर १९४४ रोजीं आम्ही बाल-रसिकांच्या हातीं देऊं शकूं, अशी आम्हाला खात्री आहे.**

आपल्यापुढें असलेल्या या पुष्पांचें चोखंदळ रसिक पालकांनीं एकदां अवलोकन केल्यावर—**आपल्या बालकांना तीं सर्व दृष्टीनें फार आवडतील, त्यांना उद्बोधक व साहाय्यक होतील,** अशी त्यांची खात्री होईल, यांत आम्हाला संदेह नाहीं.

**(३) उगवत्या-वाढत्या पिढीला आनंद-ज्ञान-दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्त्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोद्रय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें '**मनोरंजक**' व '**ज्ञान**' असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें—१) '**शिशुश्रेणी**' (वय वर्षें ७ पर्यंत), (२) **बाल-श्रेणी**' (वय वर्षें १२ पर्यंत,) (३) '**किशोर श्रेणी**' (वय वर्षें १४,) व (४) '**कुमार-श्रेणी**' (वय वर्षें १७ पर्यंत) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या--टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षीं होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

प्रथम वर्षाची विशेष फायद्याची **'परिचय सवलत--'**

**या वर्षाच्या एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५-१३-० होते.** चार आणे प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४-१३-० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून ( रु. ४-१३-०+०-४ ०=५-१-० ) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं हीं पुस्तकें, रु. ४-१२-० मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें नांवही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं.**

प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहाय्य करीत आलेल्या, आज करीत असलेल्या व पुढें करतील त्या सर्व शिक्षणतज्ञ स्नेही मंडळीची संस्था सदैव ऋणी राहील. विशेषत:, पुढील मंडळीचा " **घरची सहाय्यक मंडळी** " म्हणून उल्लेख करतांना संस्थेला साभिमान आनंद वाटत आहे.

## आमचे ऋणानुबंधी—

श्री. **वासुदेव त्र्यं. यार्दी**, एम्. ए. बी. टी. ( प्रिन्सिपॉल, न्यू इंग्लिश स्कूल, वसई ), श्री. **गो. स. नणंदीकर**, बी. एस् सी. बी. टी. ( पुणें ); श्री. **शांताराम बी. सबनीस**, एम्. ए. बी. टी. ( बडोदें ); श्री. **तिमाप्पा ए. कामत**, बी. ए. बी. टी. Dip. Phy. Ed. ( मुंबई ); श्री. **मधुकर वा. धोंड**, एम्. ए. एल्एल्. बी. एस्. टी. सी. ( मुंबई ); श्री. **के. जी. कुळकर्णी**, बी. ए. बी. टी. ( मुंबई ); श्री. **ना. गो. तवकर**, बी. ए. एस्. टी. सी. [ प्रिन्सिपॉल, दादर विद्यामंदीर ]; डॉ. **मुकुंद दि. मनोहर** एम्. एस्सी. पी. एच्डी. [मुंबई]; श्री. **श्रीनिवास स. पाटकर**, बी. ए. एस. टी. सी. [ मुंबई ]; श्री. **व्ही. एच्. फाळके**, बी. एस्सी. बी. टी. [ नासीक ]; श्री. **एस्. एन. मोकाशी**; बी. ए. बी. टी. [ मुंबई ] आणि इतर स्नेही.

' **अमर-ज्योति वाङ्मया** 'ला आश्रय मिळवून देऊन, उत्तम लेखन साहाय्य करून, उपयुक्त व आवश्यक अशा नवीन प्रकाशनाबाबत कल्पना सुचवून वगैरे हस्ते परहस्तें जी. जी. सक्रीय मदत केली जाईल त्याबद्दल त्या त्या आस्थेवाईक हितचिंतकांची संस्था सदैव ऋणीच राहील.

चालक:—सौ. **स्नेहल सामंत**, पी. ए.

मुख्य संपादक: श्री. **रघुवीर सामंत**, बी. ए. बी. टी.

कचेरी:—अमर ज्योति प्रकाशन, १४ बी. हरजीवन एस्टेट, दादर.

# १–‘अजिंक्य-पंडित’ !–

## १

पूर्वीच्या काळीं, प्रत्येक राजाच्या पदरीं मोठमोठे विद्वान् असत. राजदरबारीं त्यांना फार मान असे. त्यांच्याबरोबर वादविवाद करून राजा आपण स्वतः ज्ञान शिके, आपल्या जिवाची करमणूक करी; आणि आपल्या भोंवतालच्या माणसांनाही ज्ञानी व शहाणे होण्याची संधी देई.

एका देशांतील मोठमोठे पंडित कधीं कधीं दुसऱ्या राजांच्या दरबारांत जात. त्या राजासमक्ष, त्यांच्या पदरीं असलेल्या पंडितांशीं वाद-विवाद करीत; ते जिंकले, तर राजा त्यांनाही आपल्या पदरीं मानानें ठेऊन घेई; किंवा त्यांना मोठीं पारितोषिकें देऊन त्यांची सन्मानानें बोळवण करी.

## २

बहुश्रुत राजाच्या दरबारांतही असेच अनेक पंडित होते. पण त्या सर्वांत, विशालबुद्धि नांवाचा वृद्ध पंडित फारच विद्वान् होता. त्याची कीर्ती चोहूंकडे दुमदुमत होती. आजपर्यंत, त्याच्याशीं वादविवादांत कोणी टिकलें नव्हतें. या त्याच्या लौकिकामुळेंच, कोणा नव्या पंडिताची त्याच्यापुढें उभें रहायची सुद्धां छाती होत नसे. जणूं काय, आजूबाजूच्या राज्यांतील सर्व पंडितांनीं त्याला अलिखित अजिंक्यपत्रच दिलें होतें.

अशा या प्रतापी पंडिताच्या घरांत मात्र सांवळा गोंधळ होता.

कारण, त्याला चार मुलगे होते. पण ते चारी ‘मोठ्याचे खोटे मुलगे!’ आळशी, मूर्ख, बडबडे!

विशालबुद्धि जसजसा अधिक वृद्ध होत चालला, तसतसा त्याचा हा हृद्रोग जास्तच वाढला. त्याला आपल्या मूर्ख मुलांचा राग येई; आपल्या पश्चात् काय होणार याबद्दल मनांत मनस्वी दुःख होई; व मुलांच्या दुर्दैवी दारुण भावीकाळाची कल्पना डोळ्यांपुढें उभी राहून त्यांची त्याला कींवही वाटे.

## ३

एके दिवशीं, यद्भविष्य, सुखासीन, निद्राप्रिय व हास्यमुख अशा आपल्या त्या चारी मुलांना विशालबुद्धीनें आपल्याजवळ बोलावलें व तो त्यांना गंभीरपणें म्हणाला—"बाबांनों, मी जिवंत आहे तोंपर्यंत तुमची नुसती खुशाल चैन चालली आहे. पण उद्यां....परवां....पुढें काय होणार आहे ! याचा कधीं विचार केला आहेत कां ? अरे, अजूनही जागे व्हा. माझ्यापासून कांहीं विद्या शिका; शहाणे व्हा! केवळ बापाच्या नांवावरच फक्त तुम्हाला जन्मभर जगतां येणार नाहीं ! उलट, शिकून हुशार झालांत, तर बापाच्या पश्चातही त्याचें नांव मागें राखाल. त्याची गादी मोठ्या अभिमानानें पुढें चालवाल !....नाहीं तर मात्र तुमचे हाल कुत्राही खाणार नाहीं. फक्त हातीं नरोटी घेऊन गांवोगांव भीक मागावी लागेल!–"

पण त्याचे ते शद्ध शब्दच राहिले. आणखीही दिवसांमागून दिवस व वर्षांमागून वर्षें गेलीं; पण ते मुलगे कांहीं शिकले नाहींत. आळस, चैन, गंजिफा–सोंगट्या–फाशांचे खेळ,....यांतच त्यांचें निष्क्रीय आयुष्य पुढें जात होतें.

## ४

त्यामुळें तर विशालबुद्धी अधिकच दुःखी झाला. आणि शेवटीं, त्याच दुःखाच्या झुरणीनें तो आजारी होऊन बिछान्याला खिळला.

आतां आपण जगत नाहीं, हें जाणून, एके दिवशीं आपल्या

चारी मुलांना पुन्हां आपल्याजवळ बोलावून विशालबुद्धि म्हणाला– "यद्भविष्य, सुखासीन, निद्राप्रिय, हास्यमुख!....मी तर हा चाललोंच! आतां अगदीं चार घटकांचा सोबती मी! पण तुम्हाला शेवटचं एक सांगतों,–तें तरी नीट लक्षांत घ्या आतां!"

चारी मुलांचें हृदय अगदीं कालवून आलें. बाप मृत्युशय्येवर पडून तसें बोलत असतांना पहातांच त्यांचेही डोळे ओले झाले.

"मी मेल्यावर, माझ्या लौकिकामुळेंच, तुम्हाला राजाकडून पंडितकीचीं वस्त्रें मिळतील. तुम्ही आपलं पांडित्य काय गाजवणार, तें दिसतंच आहे. पण निदान एक करा–" विशालबुद्धी श्वास टाकून, अडखळत म्हणाला, "जेव्हां राजाकडून तुम्हाला नेण्यासाठीं प्रथमच पालखी येईल, तेव्हां तुमच्याबरोबर असा एक कोणी माणूस न्या, कीं, ज्याचा रोजचा धंदा सारखा अगदीं अव्याहत चालू आहे! आणि दुसरं म्हणजे, शक्य तर दरबारांत कधीं बोलूंच नका! बोललांतच तर, एका वेळीं एकजणच बोला. आणि दोन शब्द बोलावेतसं वाटलं, तर शक्य तों एकच शब्द बोला!...."

एवढें म्हणून, म्हाताऱ्यानें आपल्या मुलांकडे पहात पहातच प्राण सोडला.

त्या चारी मुलांना, त्यावेळीं मात्र फार फार वाईट वाटलें. 'आपण आजपर्यंत विनाकारण आयुष्य दवडलं,' याचें त्यांना दारुण दुःखही झालें.

पण आतां त्याचा काय उपयोग होता?....बैल गेला नि झोंपा केला, अशी स्थिती होती ती!

५

विशालबुद्धी मेल्यावर, राजानें प्रधानाकरवीं पंडितकीचीं वस्त्रें त्याच्या त्या चारी मुलांना पाठवलीं.

बापाच्या शद्बाची आठवण होऊन त्यांनीं कांहीं न बोलतांच तीं स्वीकारलीं व राजाचे आभार तेवढे मानले.

" बहुश्रुत राजाच्या पदरचा विशालबुद्धि पंडित मरण पावला व त्याचे चार मुलगे आतां त्याची गादी चालवणार!" ही वार्ता चारी बाजूला पसरली. आतांपर्यंत दबकून-भिऊन वागणारे देशोदेशचे पंडित एकदम खडबडून जागे झाले. आतांपर्यंतचे विशालबुद्धीचें व त्याबरोबरच बहुश्रुत राजाच्या दरबारचें पांडित्याचें अजिंक्य-पद कायम होतें; तें हिरावून घेण्यास आतां ही संधि उत्तम आहे, हें जाणून, शेजारच्या राज्यांतील एका महापंडितानें बहुश्रुताकडे आव्हान पाठविलें.

" देशोदेशीं जाऊन, इतर सर्वांना जिंकणारा हा महापंडित! तोच आपल्याकडे येत आहे!" हें पाहून बहुश्रुत राजालाही एकदम नवा चेव आला!....त्यानें लागलीच पंडित यद्भविष्य, पंडित सुखासीन, पंडित निद्राप्रिय व पंडित हास्यमुख यांना दरबारांत हजर रहाण्यासाठीं, चार मखमली पालख्या शृंगारून त्यांच्या घरीं पाठवल्या.

## ६

त्या पालख्या त्यांच्या दाराशीं पाहून दारावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या डोळ्याचें अगदीं पारणें फिटलें! पण—

—त्या चारी मुलांच्या डोळ्यांपुढें मात्र काजवेच चमकले. त्यांना क्षणभर भोंवोळ आली. अंगाला कांपरें सुटलें.

पण मग, आतां 'आलीया भोगासी असावें आदर' या न्यायानें, त्यांना दरबारांत हजर रहाणें तर प्राप्तच होतें. मोठा पेंच पडला त्या वेळीं त्या पंडितचौकडीला!—

तेवढ्यांत त्यांच्या बापानें मरतांमरतां केलेला उपदेश, त्यावेळीं त्यांना एकदम आठवला.

त्याप्रमाणें वागून तरी दुसरें विशेष निराळें काय होणार, हें त्यांना कांहीं समजेना.

तरी पण, निदान पित्याच्या पश्चात् त्याला आपला आज्ञाधारकपणा दाखवावा, असें त्यांनीं मनांत ठरवलें.

'चार तास थांबा ! आम्ही एक काम संपवून येतों !' असें राजदूतांना सांगून ते चौघे घराबाहेर पडले.

## ७

अव्याहत धंदा चालू असलेला मनुष्य शोधण्यासाठीं ते त्या गांवभर प्रत्येक रस्त्यांतून सारखे फिरत होते.

लोहार, सुतार, गवंडी, सोनार, वाणी, साऱ्यांकडे पहात पहात, ते पुढें चालले होते. परंतु प्रत्येकाचें काम कांहीं अव्याहत चालतांना मात्र त्यांना दिसेना. प्रत्येक मध्येंच काम करी, मध्येंच थांबे; तसला मनुष्य त्यांना नको होता.

शेवटीं, एका तेल्याच्या घाण्याजवळ ते चौघे आले. घाण्यांत वरून तीळ घालणें, खालून तेल काढून घेणें अशी कामें चालू होतीं; तसेंच पेंड काढून घेणें, तेल व पेंड विकणें हींही कामें एकाच वेळीं त्याबरोबर चालू होतीं.

आणि तरी देखील घाणा अव्याहत गरगरत होता. बैल जरा देखील थांबत नव्हता !

## ८

त्या चौघा पंडितांनीं, मोठ्या समाधानानें एकमेकांकडे पाहिलें. 'हाच तो आपल्याला उपयोगी असा धंदेवाईक मनुष्य !'....असा भाव त्या चौघांच्याही डोळ्यांत दिसत होता.

तो तेली चांगला धिप्पाड, उंच होता. त्याच्या अंगांतले कपडे तेलकट होते. त्याच्या मिशा घोंसदार होत्या.

त्याच्याकडे जाऊन त्यांनीं त्याला सांगितलें—"तेलीदादा, आमच्याबरोबर राजदरबारांत आतांच्या आतां चला!....फक्त आमच्याजवळ बसा, म्हणजे झालं! आम्ही तुम्हाला मोठें बक्षिस देऊं!"

'राजदरबार,' 'आतांच्या आतां निघणें' वगैरे गोष्टी एकाएकी कानावर पडतांच, तेली प्रथम थोडा गांगरला; पण मग म्हणाला, "मी? वा! मी हो तेथें येऊन करणार काय?"

चौघे पंडित म्हणाले—"तुम्हीं कांहींएक करूं नका! आपणहून अगदीं बोलूं सुद्धां नका. पण कोणी कांहीं विचारलं, तर मात्र तुम्हाला वाटतील-सुचतील ती एखाद-दोन उत्तरं द्या!"

थोडा विचार केल्यावर, तेल्याला तो सौदा पटला. त्यानें आपल्या बायकोला घाण्यावर बसवलें.

तो घरांत गेला. थोड्या वेळानें तो बाहेर आला; त्यावेळीं त्याच्या हातांत एक पुरचुंडी व एक गाडगें होतें!

पंडितांनीं आश्चर्यानें विचारलें, "हें हातांत हो काय, तेलीदादा?"

तेली हसून म्हणाला, "ही? ही माझी शिदोरी! या सात भाकऱ्या आहेत; नि या गाडग्यांत तोंडीं लावायला दहीं घेतलं आहे! अहो, वेळ आहे, काळ आहे-उशीर झाला तर उपाशी रहायला नको! मी बुवा भुकाळू माणूस आहे एक!...."

## ९

तेल्याला घेऊन, चारी पंडित पालख्यांतून दरबारांत दाखल झाले.

तेलीदादाच्या 'ध्याना'सह पंडित व दह्याच्या गाडग्यासह तेली-दादा त्या विद्वानांच्या सभेंत शिरले.

राजासह सारे आश्चर्यानें त्यांच्याकडे टकमक पहात होते.

राजाला वंदन करून ते पंडित चतुष्टय राजाच्या उजव्या हाताला जाऊन निमूट बसले. त्यांच्या मागें तो तेली गप्प उभा राहिला. आपली शिदोरी व दह्याचें मडकें, दोन्ही त्यानें आपल्या जवळच जमिनीवर ठेवलीं.

राजाला वाटलें, 'यांत आपल्या चतुर पंडितांचा कांहीं तरी कावेबाज डाव असणार !' तेव्हां तो हसतमुख होऊन गप्पच बसला !

आव्हान देऊन आलेला महापंडित राजाच्या डाव्या बाजूस पंडितांच्या समोरच बसला होता. तो जरा बावरल्या नजरेनेंच आपल्या प्रतिस्पर्ध्यांकडे–विशेषतः तेलीदादांकडे–पहात राहिला.

सारा दरबार अगदीं गप्प बसला होता.

सुई पडल्याचासुद्धां आवाज येईल, इतकी शांतता होती भोंवतीं !

शेवटीं, महापंडितानें बहुश्रुत राजाला हळूंच विचारलें. "महाराज, वादाला सुरवात करावी काय ?"

राजानें आपल्या पंडितांकडे मान वळवून हंसतमुखानें पाहिलें.

'शक्य तर बोलूंच नका' हा आपल्या बापाचा उपदेश पंडितांना त्याचवेळीं आठवला. त्यांनीं राजाला मानेनेंच 'हो' म्हणून सांगितलें.

महापंडितानें ती सूचना घेतली व समोरच्या चार पंडितांकडे बिचकत बिचकत एकदां पाहिलें.

त्यांची छाती तर आंत अगदीं धडधडत होती. 'आतां आला बिकट प्रसंग !' असें वाटून, त्या चौघांनीं आपल्या मागें उभ्या असलेल्या तेल्याकडे हळूंच वळून पाहिलें व पुन्हां महापंडिताकडे एकदां ओझरतें पाहून, ते झांकली मूठ सव्वा लाखाची ठेवीत, खालीं मान घालून वसले.

## १०

तेवढ्यांत, तेली एकदा हळूंच खांकरला.

महापंडित त्याच्याकडे बिचकून पाहूं लागला.

सारे दरबारचे लोक डाव्या–उजव्या दोन्ही बाजूला उत्सुकतेनें टकमका पाहूं लागले.

इतक्यांत–महापंडितानें उभ्या असलेल्या तेल्याकडे ताठ्यांत पहात एक बोट दाखवलें.

तेल्यानें गंभीर चेहरा करून त्याला उलट दोन बोटें पटकन् पुढें करून दाखवलीं.

तें पहातांच, क्षणभर थांबून, महापंडितानें जरा तुच्छतेचा चेहरा केला व मग तेल्याला हाताचा पंजा उघडून पांच बोटें दाखवलीं.

तेल्यानेंही गंभीर चेहरा केला व आपली हाताची वळवलेली मूठ पुढें करून दाखवली.

महापंडितानें किंचित् काळ तेल्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें टवकारून पाहिलें; मग जमिनीवर हातानें सात रेघा काढल्या व त्याच्याकडे पाहिलें.

तेल्यानें क्षणभर थांबून होकारार्थी मान हलवीत त्या सात रेघांवर एक उभी रेघ काढून दाखवली.

त्यावर, महापंडितानें तेल्याला पटकन् हात हलवून 'कुठें?' अशी खूण केली.

तेल्यानेंही तितक्याच चपळाईनें आपलें दह्याचें गाडगें आपल्यासमोर ठेऊन महापंडिताकडे अभिमानानें पाहिलें.

११

हें एवढें झालें मात्र; महापंडित जायला उठला.

तो उठलेला पहातांच चारी पंडितांनींही हळूंच वर मान करून पाहिलें. तों तो महापंडित त्यांच्यासमोर व बहुश्रुत राजासमोर खालीं वांकून वंदन करत होता.

तेवढ्यांतच तेलीदादा एकदां खदखदां हंसला !

राजासकट सारेच अतिशय चपापले.

पण कांहींएक न बोलतां, तो महापंडित मात्र तसाच तडख दरबाराबाहेर निघूनही गेला.

क्षणाचा विलंब न करतां, चारी पंडित जागेवरून पटकन् उठले व राजाला नमस्कार करून दाराकडे चालूं लागले. त्यांच्यामागून तेली-दादाही आपली शिदोरी व दह्याचें मडकें घेऊन हंसतमुखानें दरबारांतून बाहेर पडला आणि चालूं लागला.

स्वत: राजा व दरबारचे सारे लोकही मोठा अचंबा करीत होते–कीं, 'बोलणें वादविवाद कांहीं न होता महापंडित हरला कसा ? नि मान खालीं घालून निमूट निघून गेला तरी कसा ?–'

## १२

इकडे तो महापंडित आपल्या वास्तव्य ठिकाणीं पोहोंचला. त्याला भेटायला दरबारांत जमलेल्या पंडितांपैकीं कित्येक त्याच्या मागोमागच तेथें आले होते.

त्यांनीं महापंडिताला आश्चर्यानें विचारलें—"महापंडित, आपण वादविवाद करून त्या पंडितांना जिंकायला म्हणून ना दरबारांत गेलांत ? आणि मग त्यांच्याशीं तर कांहींएक न बोलतां, कांहीं वादविवाद न करतांच दरबारांतून लगबगीनें निघून काय आलां ? आम्हाला अगदीं कोडंच पडलं आहे ?"—

जरा खिन्न चेहऱ्यानें महापंडित म्हणाला, "त्यांत कोडं हो कसलं ? मी वादांत सपशेल हरलों. मला तेथें क्षणभरही मान खालीं घालून बसवेना; म्हणून तर निघालों."

"पण आपण पंडितांबरोबर तर कांहींच बोलला नाहीं !" साऱ्यांनीं पुन्हा गोंधळून विचारलें.

"पण त्यांच्याबरोबर त्यांचा तो वरवर अडाणी दिसणारा नोकर होता ना ?....त्यानेंच मला जिंकलं!—मग त्या पंडितांच्या वाटेला कसा जाणार मी ?" महापंडित म्हणाला—"खरंच विशालबुद्धि थोर मनुष्य! नि हेही बापसे बेटे सवाई खरेच! बहुश्रुत राजाच्या पदरीं रत्नं आहेत रत्नं एकेक!—"

"कशावरून म्हणतां हें तुम्ही ?" जमलेल्या पंडितांपैकीं कांहींनीं कुरकुरत विचारलें, "आम्हांला तर कांहींच दिसलं नाहीं!"

"तुम्हाला नसेल तें दिसलं!...पण मला समजलं! ज्यांच्याशीं वाद करायला मी आलों होतों, त्या चारी पंडितांना नि त्यांच्या त्या शिष्यालाही समजलं!" महापंडित स्वतःच्या पाडावानें दुःखी झाला होता, तरी रसिक होता; आपल्या पराभवाच्या वेळींही दुसऱ्याच्या गुणांचें चीज करायला तो डगमगला नाहीं.

म्हणूनच तो पुढें म्हणाला—"अहो, राजानें संकेतानें वाद-विवाद करायला सांगितलं. तेव्हां मी पंडितांकडे पाहिलं; पंडितांनीं आपल्याजवळ उभ्या असलेल्या आपल्या रांकट दिसणाऱ्या शिष्याकडे पाहिलं. आणि मला त्यांनीं त्या खुणेनें सांगितलं कीं, 'आधीं आपण या आमच्या शिष्याशीं संकेतानें वाद करा;....मग आम्ही आहोंच!'"

"असं ऽ ?" जमलेले सारे आश्चर्यानें उद्गारले.

## १३

महापंडित पुढें म्हणाला—"हं!–तो माणूसही माझ्याकडे टक-कारून पहात होता. एकदां खांकरून...'सुरवात करा' म्हणून सुचवलं त्यानें मला!—तेव्हां मी वादास सुरवात करण्यासाठीं सहज एक बोट दाखवून त्याला म्हणालों, कीं, 'जगांत ईश्वर एक आहे!' तो गंभीर चेहरा करून दोन बोटें दाखवून मला म्हणाला–'असेल; पण द्वैताचीही कल्पना तुम्हाला असे-लच!–पुन्हा ईश्वर व माया अशी जोडीच नाहीं कां वेदांतानें सांगितलेली ?'

"तेव्हां मध्येंच त्याला जरा फसवण्यासाठीं मी तुच्छतेनें पांच बोटें दाखवलीं; नि त्याला दर्शविलें, कीं, 'ईश्वर–माया अशी दोन दाखवतां, तर मग जगांत पांच महाभूतें आहेत,...ती हो कशी?' त्यानें अधिक गंभीर चेहरा करून मला मूठ दाखवून सुचविलं, कीं, 'त्याच पंचमहाभूतांतून पुन्हा एक मानव देह तर होतोच की नाहीं? झालं तर!'

"त्या चतुर प्राण्याला दुसऱ्याच विषयाकडे फसवून वळवावं, म्हणून मी जमिनीवर सात रेघा काढल्या व विचारलें, कीं, 'जगांत सात समुद्र आहेत हें तुम्हाला माहीत आहे काय?'....त्यानें किंचित् थांबून 'हो' अशी मान हलवली, व उभी रेघ काढून मला दाखवलं,..'पण त्या सात समुद्रांतूनच मेरुपर्वत जातो!' तें त्याचं ज्ञान पाहून मी मनांत जरा अधिकच चरकलों. तरीही उठतां उठतां शेवटची परीक्षा घेण्यासाठीं हातानें त्याला मी पुढें विचारलें—'हा मेरुपर्वत कुठेसा आहे हो?' तर झटकन् समयसूचकता दाखवून त्यानें दह्याचं गाडगंच पुढें ठेऊन मला सांगितलं, कीं, 'एवढंही ठाऊक नाहीं तुम्हांला? मेरुपर्वत दधिसमुद्राजवळ आहे!'"

## १४

"अस्सं, नाहीं?.." अगदीं कुंठितमति होऊन सारे पंडित अचंबा करीत म्हणाले, "न बोलतांही एवढा वादविवाद झाला तुमचा म्हणायचा?"

"मग आतां तुम्हीच पहा!–" तो महापंडित म्हणाला–"त्या पंडितांचा रांगडा नोकरच एवढा हुशार, तर खुद्द त्यांना हो मी कसा जिंकणार होतों? पुन्हां त्यांचा गुरु,..त्यांचा प्रत्यक्ष बाप विशालबुद्धिच!–तेव्हां मी काढता पाय घेतला आपला!—मला पटलं, कीं....बहुश्रुत राजाच्या दरबारांतील पंडितांचं अजिंक्यपद अजूनही कायम रहाण्याच्या लायकीचंच आहे निःसंशय!"

महापंडितानेंच तसें सांगितल्यावर, चोहोंबाजूस हां हां म्हणतां

ख्याती पसरली, कीं,...."बहुश्रुत राजाच्या दरबारचे प्रमुख चार पंडित अगदीं अजिंक्य आहेत!"

## १५

इकडे त्या तेल्यासह ते अजिंक्य पंडित ठरलेले चारी भाऊ आपल्या घरीं येऊन पोहोंचले.

'आपण आज वादांत जिंकलों,' हें त्यांना दिसलें; पण 'एकूण दरबारांत झालं काय?' तें मात्र त्यांना कांहीं केल्या समजेना.

तेली तर दरबारांतून बाहेर पडल्यापासून एकसारखा हसत होता.

तेव्हां त्यांनीं जरा आदरानेंच तेल्याकडे पहात त्याला विचारलें—"तेलीदादा, तुम्ही मघां दरबारांत दोनदां हसलां! आतांही सारखे हसतांहा! असे हसतां कां तुम्ही?"

"अहो, हसूं नको तर मग काय करूं म्हणतां?" तो तेली पुन्हां खदखदत म्हणाला, "बरं झालं मी तुमच्याबरोबर होतों हें!—मोठा शहाणपणा करायला आला होता तो पागोट्या! माझ्याशी गांठ पडली म्हणूनच चांगली फटफजीती उडाली नि निमूट घरीं निघून गेला. आतां पुन्हा वर तोंड करणार नाहीं तो कधीं जन्मांत!"

## १६

त्या त्याच्या शद्बांमुळें तर चारी पंडित अधिकच गोंधळले; नि त्यांनीं त्याला अडखळत विचारलें—"पण तेलीदादा, तुम्ही एवढं ज्ञान, एवढं शहाणपण शिकलांत कुठें?"

"अहो, आहे काय त्यांत? माझ्या नेहमीच्या धंद्यांतच! तें कां कुठें शाळेंत जाऊन शिकावं लागतं?" तेली अभिमानानें म्हणाला.

अधिकच बुचकळ्यांत पडून पंडितांनीं त्याला पुढें विचारलें.... "पण त्यांनीं खुणा काय केल्या, तुम्हीही खुणा काय केल्यात?....नि

शेवटीं तो एकाएकी आम्हाला व राजाला वांकून नमस्कार करीत निघून गेला काय !....हें सगळं झालं कसं ?....आम्ही ऐकतों,..कीं, तो तर एक प्रसिद्ध अजिंक्य महापंडित आहे !—आणि तुम्ही तर...."

तेली पुन्हां खदखदां हंसूं लागल्यामुळें त्यांचें तें वाक्य अर्धवटच राहिलें. तेवढ्यांत, प्रयासानें हंसूं आवरत तेली म्हणाला—" तो महापंडित असेल,....नाहींतर त्याचा बाप असेल !....आपल्याला काय करायचंयं त्याच्याशीं ? माझ्यापुढें तर नांगी टाकलीन् कीं नाहीं ?–चुरमुरे खातच गेला बेटा !"

" म्हणजे हो कसं ? " धीर न धरवून पंडितांनीं अजीजीनें तेल्याला विनन्ति केली,...." आम्हांला सागा !—"

## १७

" अहो, महा वाईट नि घमेंडखोर मनुष्य होता तो !—" तेली स्पष्टीकरण करूं लागला–" तुमच्याकडे तो रागानें पाहूं लागला; तुम्ही माझ्याकडे पाहूं लागला. तेव्हां मी समजलों, तुम्ही मला काय सांगितलंत तें. मग मी त्याच्याकडे पाहून मनांत म्हटलं,....' पाहून घेईन बच्चंजी ! ' नि मोठ्यानें खांकरलों एकदां !

" मी ताठ्यानें त्याच्याकडे पाहिल्यामुळें तो रागावला वाटतं,.... कारण एक बोट पुढें करून त्यानें मला खुणेनें सांगितलं— ' एक डोळा फोडीन बघ तुझा ! '....मी जरा रांकट चेहरा करून त्याला उलट दोन बोटें दाखवून सांगितलं, ' अरे जारे !—तुझे दोन्ही डोळे फोडीन ! ' त्यामुळें तो मनांत चिडला नि माझ्याकडे तिरस्कारानें पहात मला हाताचा पंजा दाखवून म्हणाला—' ही माझी चपराक पाहिलीस का ? '–मीही तसंच दमांत त्याला मूठ वळून दाखवून म्हटलं....'राव, आमचे हात काय कांदे खायला गेले आहेत होय ?....हें मनगट नि ही मूठ बघा....माझ्या एका ठोशांत पाणी प्यायला लागेल आपल्याला ! '

" थोडा वरमून तो माझ्याकडे निरखून पहात, जमिनीवर सात रेघा काढून म्हणाला....' एवढा ताकदवान आहेस तूं,....तर सात भाकऱ्या खात असशील?' मी मान हलवून त्याला म्हणालो 'हों;' पण मध्यें उभी रेघ काढून त्याला सांगितलं ' वेळेला मात्र साडेतीन साडेतीन खातो '—

" तो मला हातानें विचारतो....' कशाबरोबर खातोस रे?' तेव्हां गाडगें पुढें करून दाखवून मी म्हणालों, 'ह्या दह्याबरोबर!' नेहमीं एवढं पौष्टिक खाणारा नि अशा धिप्पाड देहाचा माझ्यासारखा मनुष्य समोर पाहून तो घाबरला; नि पटकन् उठून नमस्कार करून पळून गेला. तें पाहून तर मला हसूं आवरेना दरबारांत सुद्धां!"

१८

एवढं ऐकल्यावर त्या पंडितांना तेल्याचें व आपलें एकूण पांडित्य तत्काळ समजलें. नि त्यांना मनांतल्या मनांत उलट लाजच उत्पन्न झाली.

' खरं म्हणजे महापंडित अधिक घाबरला, तो आपल्या बापाच्या पांडित्याच्या कीर्तीला!' हेंही मग त्यांच्या लक्षांत आलें.

' आजची वेळ तर कर्मधर्मसंयोगानें व बापाच्याच चातुर्यानें मारून नेली नि आपण,...आपली किंचितही पात्रता नसतां,...अजिंक्य पंडित झालों. पण आतां अहोरात्र अभ्यास करून खरेखुरे अजिंक्य पंडितच व्हायचं ' असें ठरवून, ते त्याच दिवसापासून त्या उद्योगाला लागले.

---

# २—डोक्यांतले दगडधोंडे—

अगदीं गरीबींतून वरपर्यंत चढत गेले होते बच्चूशेट; ते मुंबईतले मोठे व्यापारी होते.

त्यांचा अठरावीस वर्षांचा एकुलता एक मुलगा घेलाभाई; त्यांच्याच धंद्यांत त्यांना मदत करी.

घेलाभाई आपल्या वडिलांच्या कद्रूपणाला हसे. त्यांच्या थोड्या तिरसट व संशयी स्वभावाबद्दल फार कुरकुर करी.

त्याला आपल्या श्रीमंतीचीही खूप घमेंड होती. त्या श्रीमंतीमुळेंच त्याच्याभोंवतीं जमणारे सारेच जण त्याला आपले मोठे मित्र वाटत.

त्या त्याच्या मित्रांमध्यें चतुरभाई हा तर पक्का लबाड होता. तो तोंडपुज्या, बडबड्या नि मुत्सद्दी होता. पण घेलाभाईला उलट तोच मोठ्यांत मोठा मित्र वाटे.

बच्चूशेटजींना आपल्या मुलाची व चतुरभाईची ती मैत्री आवडत नसे. पण चतुरभाईला एकदम तोडल्यानेंही आपल्या मुलाला वाईट वाटेल व त्याचा परिणाम उलटा होईल हेंही अनुभवी बच्चूशेट जाणून होते.

## २

एके दिवशीं दुकान बंद करतां करतां बच्चूशेट घेलाला हांक मारून एकदम म्हणाले—“ घेला ! बेटा, मोठा व्यवहार जुळवायला आपल्याला महिनाभर मुंबई सोडून उत्तर हिंदुस्थानांत जायचंय् अगदीं आजच्या आज !....जवाहिर-बिवाहिरांची मोठी पेटी मी बंद करून ठेवली आहे. पण ती आतां बँकेत ठेवायलाही वेळ नाहीं. दुकानांत ठेऊन तर भागणार नाहीं. कोणाकडे सुरक्षित ठेऊन आपल्याला तासाभरानें निघालंच पाहिजे आहे !—”

पेटी शेटजींच्या हातांतच होती. घेलाभाई कुतूहलानें म्हणाला—“ बचूं काय काय आहे तिच्यांत ?....”

“ लागलास पुन्हां तेवढ्यांत चांभारचौकशा करायला !–” शेटजी जरा रागानें म्हणाले–“ आतां वेळ आहे अगदीं थोडा !....पेटी ठेवायची कोठें हा प्रश्न चाललाय्, तर म्हणे बचूं आंत काय आहे तें ?”

घेलाभाईला बापाच्या त्या गुपित करण्याच्या पद्धतीचा व एकदम अंगावर वसकन् ओरडण्याचा मनस्वी संताप आला.

तो घुश्श्यांतच म्हणाला,—" मग करा काय तें तुमचं तुम्हीच !–"

" असा रागावूं नकोस, बेटा!" बच्चूशेट आपल्या मुलाच्या पाठीवर प्रेमानें हात ठेवीत म्हणाले—" आंत काय जोखीम आहे तें मला ठाऊक आहे !—पण ती जोखमाची पेटी ठेवायची कोणाकडे? हा सारखा घोर लागला आहे माझ्या जिवाला, याक्षणीं ! मला तर कोणी खात्रीचा माणूस दिसत नाहीं जवळपास !–तूं सुचवतोस का ? बोल !–"

## ३

घेलाभाईला तेवढ्यांतच थोडें बरें वाटलें. बापानें आपल्याला सल्ला विचारून मोठेपणा दिला, यामुळेंच त्याला आपली छाती अगदीं फुगल्यासारखें वाटलें क्षणभर.

तेवढ्यांत शेटजी म्हणाले—" आतां रात्रींच्या गाडीला निघालं नाहीं, तर हजारानें नुकसान होण्याचा संभव;....पण तसंच गेलं तर हें जोखीम धोक्यांत रहातं ना इथें दुकानांत—"

" बापूजी, तसं कशाला करतां ?" घेलाभाई एकदम म्हणाला– " मी करतों कीं ती पेटी व्यवस्थित ठेवायची व्यवस्था तासाभरांत;....नि तडख स्टेशनावरच येतों..."

" तुझ्या कोणत्या माणसाची अगदीं खात्री आहे ना तुला ?" शेटजी त्याच्याकडे बेरक्या चेहऱ्यानें निरखून पहात म्हणाले.

" हो हो....तुम्हाला नको त्याची काळजी !" पेटी उचलून लगबगीनें दुकानाच्यां पायऱ्या उतरतां उतरतां घेलाभाई म्हणाला, " तुम्ही चला स्टेशनावर. मी पेटीचा नीट बंदोबस्त करून तेथेंच भेटतों तुम्हाला, अर्ध्या तासांत !"....

" बराच चलाख झालाहेसरे तूं हल्लीं !" शेटजी हसून म्हणाले, " पण संभाळून कर हो काय करशील तें !"

४

ठरल्याप्रमाणें त्या दिवशीं शेटजी घेलाभाईसह उत्तर हिंदुस्थानांत जायला गेले.

महिनाभर व्यापार करून ते परत आले.

दुकानावर आल्यावर त्यांनीं घेलाभाईला आपली जोखमाची पेटी परत आणायला सांगितलें.

घेलाभाई चतुरभाईकडे गेला व थोड्या वेळानें पेटीसह परत आला.

त्याचा चेहरा खूप रागावलेला दिसत होता.

पण शेटजी हळूंच तोंडातल्या तोंडांत हसत होते.

तेवढ्यांत घेलाभाईनें पेटी त्यांच्यापुढें रागांतच जोरानें आदळली.

कांहीं न बोलतां शेटजींनी जानव्याच्या किल्लया काढून पेटी उघडायला सुरवात केली.

तेवढ्यांत, घेलाभाई रागानें म्हणाला,—" बापूजी, तुम्ही आमची चारचौघांत फटफजीती करतां !"

शेटजी पेटीचें कुलुप उघडीत, तरीही शांतपणें म्हणाले— " काय झालं, बेटा ? मला नीट सांग !..."

" माझा मित्र चतुरभाई पेटी हातांत देतांना मला म्हणाला, ' मोठे जोखीम जोखीम म्हणून माझ्याकडे काय दगडधोंडेच दिले होतेस वाटतं ?—औरच आहांत....तुझा म्हातारा नि तूं !' " घेला कुरकुरला.

५

शेटजी पहिलें कुलूप काढून आंतून दुसरी बारीक पेटी बाहेर काढीत घेलाभाईला म्हणाले...." आणि तें ऐकूनही तूं माझ्यावरच रागावतो आहेस ?...छान !....नंदीबैल....लंबकर्ण ! अगदीं गाढवच आहेस म्हणायचा !—"

" काय हो केलं मी ? " घेलाभाई अधिकच चिडून म्हणाला— " मी उगीच बोलणीं ऐकून घेणार नाहीं तुमचीं !...."

" हीं उगीच बोलणीं ? " शेटजी थोडे चिडून म्हणाले-" हें पाहिलंस कां काय आहे तें ?...."

६

त्यांनीं त्या दुसऱ्या बारक्या पेटीचेंही कुलुप काढलें; त्यांतून आणखी एक बारीक पेटी निघाली; तिचें कुलुप उघडून त्यांतून बारक्या बारक्या गारगोट्या बाहेर काढून शेटजींनीं बैठकीवर पसरल्या.

" मग काय चुकलं, चतुरभाई म्हणाला त्यांत ? हें दिसतंच आहे ! " घेलाभाई शेटजींना रागांतच म्हणाला—

" अरे, शुंभा !....तुझं डोकं अगदींच रिकामं आहे म्हणायचं !"— शेटजी चिडून म्हणाले. " तूं आहेस आयतोबा श्रीमंत !....तसा मी नाहीं !—पै पै करून मिळवलेलं माझं जोखीम !....मी सहजासहजीं तुझ्या मित्राच्या हातीं तें महिनाभर ठेवायला देण्याइतका गाढव खास नाही. त्याच्या हातीं जोखीम म्हणून मी दगडधोंडेच देणार !....पण तुझ्या हातीं मात्र उद्यां माझ्या पश्चात् हे जोखीम येईल खरंखुरं !....चुकलं तें तुझंच चुकलं !....चतुरभाई तुझा मोठा जिगरदोस्त !....नि त्याच्या दृष्टीनें त्याचं कांही चुकलं नाही ! पण तुझं सारंच चुकलं !...."

घेलाभाई गोंधळत बापाकडे पाहूं लागला........

" अरे गधड्या, अजून नाहीं ना समजलं ? पेटींत पेटी तीन पेट्या होत्या. " शेटजी रागानें ओरडून म्हणाले-" तीन कुलपं होतीं. आंत काय आहे तें एकट्या मला ठाऊक होतं. तुलाही ठाऊक नव्हतं !—नि आतां कुलपें जागच्या जागीं आहेत, तरी तुझा तो मोठा मित्र म्हणतो आहे, आंत दगडधोंडे आहेत. माझ्या मनांतली गुप्त गोष्ट तीन्हीं कुलपें उघ-

डल्याशिवाय त्याला रे कशी समजली असेल ?—तुझ्या डोक्यांत दगड-धोंडे आहेत, हें मला ठाऊक; म्हणूनच जोखमांच्या पेटींत मी फक्त दगडधोंडेच भरले !...."

आतां कुठें घेलाभाईच्या डोक्यांत एकदम चक्क प्रकाश पडला.

तो अतिशय नरमला. नि मान खालीं घालून म्हणाला—"क्षमा करा बापूजी !—पुन्हा कधीं असं नाही होणार माझ्या हातून !...."

---

# ३-तारेनें बूट—

"गणूबाबा, हें घ्या तुमचं पत्र !" पोस्टमननें एक पिवळसर रंगाचें पाकीट पिशवींतून बाहेर काढलें. त्याच्यावर डाव्या बाजूला हिरव्या शाईत छापील मजकूर होता; व उजव्या बाजूला निळ्याकाळ्या शाईत पत्त्याचा मजकूर होतीं लिहिला होता.

आपल्या मळ्यांत गणोबा माळी मोट चालवीत होता; 'हो हो होऽ' करी बैलांना थांबवून तो म्हातारा हसतमुखानें पुढें आला.

"तुमच्या सदबाचं लष्कराकडचं पत्र दिसतंय् हें, गणूबाबा !" त्याच्या हातीं पत्र देत पोस्टमन म्हणाला.

"माझ्या सदूचं ?....मग....बघ बघ, तूंच बघ, हैबती ! वाचून दाखीव कीं मला !" गणोबा आनंदून पोस्टमनला म्हणाला.

हैबती नि सदू लहानपणीं त्या खेडेगांवात बरोबर खेळले-वाढलेले ! सदू जरा गंभीर; हैबती मुलखाचा थट्टेखोर....

गणोबानें सांगतांच सदूचें पत्र हैबतीनें त्याला वाचून दाखवलें—

सदूनें पत्रांत सर्वांची आठवण काढली होती. आणखीही काय काय लिहिलें होतें व शेवटीं म्हटलें होतें—"मी तेथून येतांना दलप्या चांभारानें मला मजबूत छानदार बूट करून दिला होता. आतां तो वापरून वापरून फाटला आहे. आम्हाला इथें बूट मिळतात खरे; पण दलप्याच्या बुटाचा झोंक कांहीं औरच. त्याच्या हातचा एखादा नवा बूट मिळाला असता तर...."

२

गणोबा म्हातारा गहिंवरला. त्याचे डोळे पाण्यानें भरले. अगदीं दाटल्या कंठानें तो म्हणाला–"बुटाची रे काय बिशाद !–आपण एक दिवसांत दलप्याकडून करवून घेऊं नवा !"

"कशाला त्या फंदांत पडतां, गणूबाबा ?" हैबती पोस्टमन सहानुभूतीनें म्हणाला, "कशाला या महागाईच्या दिवसांत खर्च ? अहो, बूट काय त्याला लष्करांत मिळत नसतील ?"—

"तें खर्चाचं राहूं दे रे, हैबती !" गणोबा डोळ्याच्या ओल्या कडा पुसत म्हणाले–"पण बूट तयार झाला, की सदूकडे लौकर कसा पाठवायचा ?–त्ये सांग मला...."

"अवो, तारेनें द्या की पाठवून !"–सदूचा चेष्टेखोर स्वभाव जागा झाला. म्हाताऱ्यानें उगीच बूट पाठवण्याच्या भानगडींत पडूं नये अशी त्याची इच्छा होती. आणि केलाच तर पाठवण्यासाठीं आपल्याकडेच तो येईल, अशी खात्रीही होती हैबतीला; म्हणून त्यानें सहज आपली जातां जातां चेष्टा केली.

"तारेनें ?....पण मग फार पैसे पडतील रे पाठवायलाच ?...." आवडत्या सदूच्या मनांतली बुटाची आवड व आपल्याकडचे पैसे यांचा मनांतल्या मनांत मेळ घालत गणोबा म्हणाला.

"छे छे, एक पै देखील खर्च नाहीं !" हैबती आपल्या पत्रांच्या पिशवीसह जाण्यासाठीं वळला, व पूर्वींसारखेंच थट्टेनें म्हणाला— "आपल्या मळ्याच्या दारावरूनच तर तार जाते. पत्ता घालून एका खांबाला बूट बांधले, कीं, झालं !....जाऊन पोचतील तडक सदूला !"

हैबती निघून गेला. गणोबा त्यावेळीं त्यावर कांहीं बोलला नाहीं. पण त्यानें मनांत सदूला तारेनें बूट पाठविण्याचें ठरवून टाकलें.

३

चार दिवसांत दलप्याकडून गणोबानें नवा बूट तयार करून घेतला. पुढल्या आठवड्यांत हैबती पत्रें घेऊन त्या खेडेगांवीं आला. गणोबानें त्याच्याकडून एका कागदावर सदूचा पत्ता लिहून घेतला.

हैबती चमकला. त्यानें सभोंवती पाहिलें. कोंपऱ्यांतच

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या !—
* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील !—
* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील.

## ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

I न्याय-चातुर्य-कथा

( किशोर श्रेणी )

१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा

२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा

३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा

४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

II सत्यकथा—

( कुमार श्रेणी )

१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा

२ शूरांचा गांव आणि इतर कथा

III अभिनय-गीतें

( किशोर श्रेणी )

१ गीत ज्योती

IV दीर्घ-कथा

१ कांहीं कमळें

V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी

( कुमार श्रेणी )

१ चार वीर

२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

कुमार श्रेणी

VI शास्त्रीय कुतूहल.

१ माणसाचें शेंपूट.

VII वाङ्मयीन चर्चा.

१ 'मी लेखक होणार.'


खानविलकर लिथो प्रेस; मुंबई २.